|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

## Department of Lifelong Learning & Extension

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./ज्ये.ना.का.प्र./४२/२०२४ **ई.पत्र** दि२२/०७/२०२४

**प्रति,**

**१) मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/समन्वयक**
**कबचौउमविशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये,**
**मान्यता प्राप्त परीसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांना..**

**२) मा.अध्यक्ष/सचिव,**
**ज्येष्ठ नागरीक संघ,**
**जळगाव/धुळे/नंदुरबार परिसर**

**विषय :-ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत..**

**महोदय/महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा विद्यापीठ आणि समाज यातील दुवा म्हणून कार्य करीत आहे. कौशल्याधिष्ठित व रोजगाराभिमुख असे विविध प्रमाणपत्र व पदविका शिक्षणक्रम चालविले चालविले जातात. तसेच बहिस्थ पदव्यूत्तर पदवी शिक्षणक्रम व काही ऑनलाईन प्रमाणपत्र शिक्षणक्रम विभाग चालविते या शिवाय ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी या समाजघटकांसाठी विविध स्वरुपाचे कार्यक्रम नोंदणीकृत संस्थाच्या माध्यमातून विभाग आयोजित करीत असते. ज्ञानविस्तार उपक्रमातंर्गत विद्यार्थी महिला विविध क्षेत्रात कार्यरत घटक यांच्यासाठी कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यापत्राद्वारे ''ज्येष्ठ नागरिक उपक्रमा' तंर्गत ज्येष्ठ नागरिक संघ/नोंदणीकृत संस्था आणि महाविद्यालये यांच्याकडून कार्यक्रम आयोजित करण्याबाबतचे प्रस्ताव मागविण्यात येते आहेत.

केंद्र, राज्य शासन व विद्यापीठाच्या ध्येय धोरणानुसार आपणही पूढाकार घेऊन समाजातील जेष्ठ, वयोवृध्द व इतर गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवू शकतात. जसे मानसिक व शारिरीक आरोग्य शिबीर, व्याख्यान व चर्चासत्र किंवा या बाबतीत आपल्या काही नवनवीन संकल्पना असतील त्यानुसार आपण कार्यक्रमाचे आयोजन करु शकतात. योग्य त्या प्रस्तावांसाठी विद्यापीठातर्फे नियमानुसार कार्यक्रम झाल्यानंतर बिल सादर केल्यानंतर अनुदान देण्यात येईल.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना तसेच सामाजिक संस्थांना व अधिकृत ज्येष्ठ नागरीक संघाना आवाहन करण्यात येते की, ज्येष्ठ नागरिकांशी संबधित उपक्रम आपल्या महाविद्यालय/ संस्था/अधिकृत ज्येष्ठ नागरिक संघ यांना आयोजित करावयाचा असल्यास नियम, अटी व शर्ती पूर्ण करणा-यांनी तसा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा.

प्रस्तावात कार्यक्रमाचे सविस्तर स्वरुप, उद्दिष्ट, कार्यक्रम कोणासाठी आयोजित करणार, कार्यक्रमास किती ज्येष्ठ नागरीक व व्यक्ती सहभागी होतील तसेच कार्यक्रम अर्धा किंवा एक दिवसाचा असेल काय याबाबत याची सविस्तर माहिती द्यावी.

**..२..**

अधिक माहितीसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमवि, जळगाव येथे ०२५७/२२५७४१५/४१६ वर संपर्क साधावा, ही विनंती. कळावे.

कळावे!

**आपला विश्वासू,**

**(प्रा.डॉ.आशुतोष र.पाटील)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**सोबतः- प्रस्ताव पाठविण्याच्या नमुना**

**प्रतः-१) मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगावः-** उपरोक्त परिपत्रकास विविध वर्तमानपत्रात बातमीच्या रुपात प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

**२) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि,जळगावः-**सदरचे परीपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकट करावे.

---

**Phone-0257-2257415/416**
**FAX-0257-2258403-406**
**वेबसाईट-nmu.ac.in**
**ई.मेल-** directorllleb@nmu.ac.in

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

## Department of Lifelong Learning & Extension

# ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम (२०२४-२५)

---

महाविद्यालय/संस्था/विभागाचे नाव :-

ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या कार्यक्रमाचे नाव :-

कार्यक्रमाचा वार, दिनांक :-

कार्यक्रमाची वेळ व ठिकाण :-

कार्यक्रमाचे स्वरुप :-

कार्यक्रमासाठी /व्याख्यान/मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणाऱ्या वक्त्यांची नावे :-

कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या :- पुरुष:- महिला :-

कार्यक्रमासाठी अपेक्षित असलेल्या अनुदानाचे सविस्तर विवरण :-

१) तज्ञ साधन व्यक्ती मानधन :-

२) सहभागी प्रतिनिंधींना चहा, नाश्ता व भोजन इतर खर्च :-

३) सभागृह, विद्युत व्यवस्था, मंडप, खुर्ची, टेबल, लाऊड स्पिकर, फोटो, प्रमाणपत्र व बॅनर इ. छपाई :-

४) प्रशासकीय खर्च :-

५) एकूण खर्च :-

**कार्यक्रम समन्वयक**
**नाव, संपर्क क्रमांक व सही**

**प्राचार्य/अध्यक्ष/विभागप्रमुख**
**सही व शिक्का**

**प्रस्ताव पाठविण्याचा पत्ता :-** मा.संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, पोस्ट बॉक्स नं.८० उमवि नगर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव पिन-४२५००१

**संपर्क क्रमांक** **:-** ०२५७-२२५७४१५ व २२५७४१६ **ई.मेल-** directorllleb@nmu.ac.in

**सूचना :-** उपरोक्त प्रमाणे सर्व माहिती आपण आपल्या महाविद्यालय/संस्था/विभाग/ ज्येष्ठ नागरिक संघाच्या लेटर हेड वर ई.मेल द्वारा पाठवावी.